औद्योगिक विकासाला चालना देण्यासाठी पायाभूत सुविधांची निर्मिती व विकासाकरिता उपलब्ध करुन देण्यात आलेल्या निधीचे वाटप करण्यासाठी कार्यपध्दती व मार्गदर्शक तत्वे विहित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
उद्योग, उर्जा व कामगार विभाग
शासन निर्णय क्रमांकः औपासू-२०१२/प्र.क्र.२३४/उद्योग-२
मादामा कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
तारीख: २५ फेब्रुवारी २०१४.

वाचा -

१) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक- आयआय पॉलीसी-२०१०/प्र.क्र./७६८/उद्योग-२ दिनांक- २२ फेब्रुवारी, २०१३.

प्रस्तावना -

महाराष्ट्र औद्योगिक धोरण-२०१३ मधील उद्दिष्टे साध्य करण्याकरिता मान्य करण्यात आलेल्या उपाय योजनांपैकी महाराष्ट्र औद्योगिक पायाभूत सुविधांचा विकासाकरिता विविध संस्थाकडून उभारण्यात येत असलेल्या पायाभूत सुविधांचे नियोजन एकत्रीतपणे करण्याच्या उद्देशाने, शासन निर्णय दिनांक २२ फेब्रुवारी, २०१३ मधील परिच्छेद ५.२ अन्वये मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली " महाराष्ट्र औद्योगिक पायाभूत सुविधा" विकास समिती ( Committee on Industrial Infrastructure Development for Maharashtra) अशी सुकाणू समिती गठीत करण्यात आलेली आहे.

२. औद्योगिक पायाभूत सुविधांचे नियोजन व उभारणीविषयी प्रयत्नांचे समन्वय करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्रातील औद्योगिक पायाभूत सुविधांची निर्मीती व विकास करण्यासाठी मंजुर निधीच्या वापर व वाटपा संदर्भात मार्गदर्शक तत्वे विहित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय-

३. औद्योगिक विकासाला चालना देण्यासाठी औद्योगिक पायाभूत सुविधांची निर्मीती व विकास करण्यासाठी प्रतिवर्षी उपलब्ध होणा-या निधीचा वापर व वाटपाची कार्यपध्दती पुढील प्रमाणे निश्चित करण्यात येत आहे.

१) उद्देश:-

महाराष्ट्रातील औद्योगिक विकासाला चालना देण्यासाठी पायाभूत सुविधा निर्माण करण्याकरिता सदर निधीचा वापर करावयाचा आहे. राज्यातील कोणात्याही पायाभूत सुविधा ज्यांचा थेट संबंध औद्योगिक विकासाला चालना देण्यासाठी येतो किंवा औद्योगिक विकासाला मदत करतो अशा कोणत्याही औद्योगिक पायाभूत सुविधांची निर्मीती व विकास या करिता उपरोक्त निधीमधून मदत देता येईल.

२) <u>निधीची उपलब्धता -</u> राज्याच्या वार्षिक योजनेमध्ये उद्योग विभागाला या प्रयोजनासाठी मंजूर करण्यात येणा-या योजनांतर्गत नियतव्ययातून, विहीत अर्थसंकल्पीय पध्दतीचा वापर करुन अर्थसंकल्पीत करण्यात येईल.

३) <u>निधीचे व्यवस्थापन :-</u> सदर निधीचे व्यवस्थापन आणि नियंत्रण करण्यास प्रधान सचिव (उद्योग) हे नियंत्रक अधिकारी असतील तसेच विकास आयुक्त (उद्योग) हे आहरण व संवितरण अधिकारी राहतील.

४) <u>निधीतुन घ्यावयाच्या योजनांची व्याप्ती /निकष :-</u>

अ) औद्योगिक विकासाच्या ध्येयपुर्तीसाठी रावविण्यास अग्रेसर पथदर्शक प्रकल्प.

आ) औद्योगिक विकासाशी थेट संबंध असणा-या वा औद्योगिक विकासाला पूरक असल्याचे सिध्द झालेल्या आणि औद्योगिक क्षेत्रात गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी हाती घेतलेल्या कोणत्याही औद्योगिक पायाभूत सुविधांची निर्मीती व विकास प्रकल्प,

इ) उत्पादन क्षेत्रात गुंतवणूक आकर्षित करण्याच्या संदर्भात नियोजित/हाती घेतलेल्या व राज्य शासनाला सदर प्रकल्प अति महत्वाचा असल्याची खात्री झालेले प्रकल्प, जसे ऊर्जा, रस्त्यांचे जाळे (Road Connectivity)

ई) सदर योजनेअंतर्गत राज्य शासनाच्या संबंधित विभागाच्या किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या वार्षीक योजनेत किंवा सार्वजनीक उपक्रमांच्या भांडवली अर्थसंकल्पामध्ये समाविष्ट नसलेल्या परंतु सदर प्रकल्प औद्योगिक पायाभूत सुविधाची निर्मीती व विकास करिता अतिमहत्वाचा असल्याची खात्री झालेले प्रकल्प.

उ) राज्यात औद्योगिक विकासासाठी सामायिक सुविधा उपलब्ध करुन देणारे औद्योगिक पायाभूत सुविधांची निर्मीती व विकास प्रकल्प.

ऊ) राज्यातील औद्योगिक गुणवत्ता वाढीसाठी चाचणी व प्रमाणिकरणाची सुविधा उपलब्ध करुन देणाऱ्या संस्थाद्वारे घेण्यात येणारे प्रकल्प.

ऋ) महाराष्ट्रातील औद्योगिक वाढीस उत्तेजन देणारे विस्तृत प्रकल्प अहवाल/ प्रकल्पासाठीचे व्यवहार्यता अहवाल/परिसंवाद/कार्यशाळा/परिषदा/ प्रशिक्षण कार्यक्रम/औद्योगिक प्रदर्शने यांचा समावेश असेलेल्या आणि महाराष्ट्रातून होणा-या निर्यात वाढीशी संबंध असलेल्या उद्योग विभागाकडून अधिसूचित करण्यात आलेल्या उपक्रमासाठी.

ऌ) राज्य शासनाच्या संबंधित विभागाच्या किंवा सार्वजनिक उपक्रमांच्या हद्दीबाहेरील २ कि.मी. लांबीचे रस्ते व २ कि.मी. लांबीच्या पाणीपुरवठा जलवाहिन्यांचे असे प्रकल्प जे उद्योग विकासासाठी पोषक वातावरण निर्मिती करीता आवश्यक असतील.

५) <u>कार्यान्वयन यंत्रणा (Implementing Agencies)</u> :- पुढील कार्यान्वयन यंत्रणांना सुकाणू समितीने मंजूर केलेल्या प्रकल्पांसाठी निधी वितरित करण्यत येईल.

१) राज्य शासनाच्या पायाभूत सुविधा निर्माण करणाऱ्या विभाग/संस्था/सार्वजनीक उपक्रम ह्या कार्यान्वियन यंत्रणा असतील जसे, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एम. आय.डी.सी.)

२) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एम.एम.आर.डी.ए.)

३) महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (एम.एस.आर.डी.सी.)

४) सार्वजनिक बांधकाम विभाग (पी.डब्ल्यू.डी.)

५) पाटबंधारे विभाग (इरिगेशन डिपार्टमेंट)

६) वन विभाग

७) महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मीती कंपनी (महानिर्मीती)

८) महाराष्ट्र राज्य विद्यूत वितरण कंपनी (महावितरण)

९) महाराष्ट्र राज्य पारेषण कंपनी (महापारेषण)

१०) महाराष्ट्र मेरी टाईम बोर्ड (M.M.B)

११) मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील सुकाणू समितीने निर्देशित केलेल्या कोणत्याही अन्य यंत्रणा

६) <u>प्रकल्पाची छाननी, मान्यता अणि संनियंत्रण :-</u>

अ) कार्यान्वयन यंत्रणा किंवा प्रशासकीय विभागाद्वारे प्रस्तावित प्रस्तावांची छाननी आणि प्रकल्पांना मंजुरी देण्यास, संदर्भाकीत दि. २२.०२.२०१३ च्या शासन निर्णयातील परिच्छेद ५.२ नुसार मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली गठीत " महाराष्ट्र औद्योगिक पायाभूत सूविधा विकास समिती" ही सुकाणू समिती सक्षम प्राधिकारी आहे. समितीने मान्यता दिलेल्या प्रस्तावांना संबंधित कार्यान्वयन यंत्रणेने त्यांच्या प्रचलित नियमानूसार तांत्रीक मान्यता देण्यात आल्या नंतर उद्योग विभागाद्वारे प्रशासकीय मान्यता देण्यात येईल.

आ) सुकाणू समितीची संरचना पुढीलप्रमाणे आहे-

| | | |
|---|---|---|
| १. | मुख्य सचिव | अध्यक्ष |
| २. | अपर मुख्य सचिव (वित्त) | सदस्य |
| ३. | प्रधान सचिव (उद्योग) | सदस्य |
| ४. | प्रधान सचिव (नियोजन) | सदस्य |
| ५. | सचिव, पाटबंधारे विभाग | सदस्य |
| ६. | सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग | सदस्य |
| ७. | महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण | सदस्य |
| ८. | व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ९. | व्यवस्थापक, महाराष्ट्र विद्युत निर्मीती कंपनी | सदस्य |
| १०. | मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ | सदस्य |
| ११. | विकास आयुक्त (उद्योग), उद्योग संचालनालय | सदस्य |
| १२. | उप सचिव, उद्योग विभाग | सदस्य सचिव |

ब) प्रधान सचिव (उद्योग) यांच्या अध्यक्षतेखालील सामुहिक प्रोत्साहन योजनेअंतर्गत गठीत राज्य पातळीवरील समिती उपरोक्त सुकाणू समितीद्वारे मंजूर करण्यात आलेल्या प्रकल्पांच्या अंमलबजावणीचा वेळोवेळी आढावा घेईल व सनियंत्रण करेल. सदर समितीची रचना पुढीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | प्रधान सचिव (उद्योग) | -अध्यक्ष |
| २. | मुख्य कार्यकारी अधिकारी म.औ.वि. महामंडळ | -सदस्य |
| ३. | विकास आयुक्त (उद्योग) | -सदस्य |
| ४. | सह संचालक (सा. प्रो.यो.) | -सदस्य सचिव |

क) प्रस्ताव सादर केलेल्या संबंधित संस्थेच्या प्रतिनिधींना सदर सुकाणू समितीच्या बैठकीत विशेष आमंत्रित म्हणून आमंत्रित करण्यात यावे.

ख) सुकाणू समितीसमोर मंजूरीसाठी सादर करावयाच्या प्रस्तावांची प्रशासनिक छाननी उद्योग विभागाद्वारे करण्यात यावी व कामाची निकड उद्योग विभागानेच ठरविणे आवश्यक राहील.

ग) उद्योग, ऊर्जा व कामगार विभागातील उद्योग धोरणाचे कामकाज हाताळणाऱ्या कार्यासनाने सुकाणू समिती व राज्यसमितीच्या संबंधित कामाचा समन्वय साधावा. सुकाणू समितीने मंजूर केलेल्या प्रकल्पांतर्गत निधी मुक्त करणे बाबत/ वितरण करण्यासंदर्भात विकास आयुक्त (उद्योग) व शासन यातील दुवा म्हणूनही हे कार्यासन काम करील.

घ) सदर योजनेच्या अंतर्गत मंजूर प्रकल्पांच्या प्रगतीच्या आढावा घेण्यासाठी प्रत्यक्ष भेटी किंवा योग्य वाटेल अशी चौकशी करण्याचा अधिकार राज्य शासनाला तसेच शासनाने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यास राहील.

(७) <u>प्रकल्प /प्रस्ताव सादर करण्याबाबत:-</u>

अ) अर्जदाराने प्रस्तावाच्या दोन प्रती प्रधान सचिव (उद्योग), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग यांचे कडे सादर कराव्या. सर्व प्रस्ताव प्रशासकीय छाननीनंतर महाराष्ट्र औद्योगिक पायाभूत सुविधा विकास समितीकडे सादर करण्यात येतील. प्रस्ताव स्वयंस्पष्ट तसेच संबंधित सर्व अभिलेख, सांख्यिकी माहिती / नकाशे, इत्यादीसह परिपूर्ण असावेत.

ब) प्रस्ताव खालील नमूद केलेल्या मुद्दे / तपशिलासह, सारांश टिप्पणीसह सादर करावा.

i. प्रस्ताव सादर करणा-या संस्थेचे पूर्ण नांव व पत्ता.

ii. कार्यान्वयन यंत्रणा (Implementing Agencies), यंत्रणेचे पूर्ण नांव व पूर्ण पत्ता तसेच सदर यंत्रणेचा प्रकार जसे सार्वजनिक उपक्रम, स्थानिक स्वराज्य संस्था इत्यादी.

iii. प्रकल्प अंतर्भूत वित्तीय भार आणि आर्थिक स्रोत.

iv. प्रकल्पांअंतर्भूत असलेल्या एकूण आर्थिक भारापैकी काही आर्थिक मदत, औद्योगिक पायाभूत सुविधांची निर्मिती व विकास निधी व्यतिरिक्त इतर वित्तीय संस्थेकडून उपलब्ध करुन घेणार आहे काय याबाबतचा तपशील

v. प्रकल्पासाठी जमिनीची आवश्यकता आहे काय, असल्यास जमीन उपलब्ध आहे काय,

vi. प्रकल्प टप्प्याटप्प्याने पूर्ण करणार आहे काय, असल्यास त्याचा तपशील व प्रकल्पाचे टप्पे पूर्ण होण्याचे दिनांक, व प्रकल्प पूर्णपणे पूर्ण होण्याचा दिनांक,

vii. कामाची व्याप्ती आणि अपेक्षित सुविधांची आवश्यकता.

viii. प्रकल्पापासून मिळणारे मुख्य फायदे.

ix. वित्तीय भार आणि अनुदानाची गरज.

x. सक्षम प्राधिकरणाच्या तांत्रिक प्रमाणपत्र.

xi. औद्योगिक पायाभूत सुविधांची निर्मिती आणि स्पर्धात्मक औद्योगिक विकासाची सविस्तर माहिती नमूद करण्यात यावी.

८) या योजनेद्वारे निधी प्राप्त होण्याकरिता प्रकल्प पुढील निकषा आधारे पात्र ठरणे आवश्यक राहील.

i. प्रकल्प, भविष्यात शास्वत फायदे देणारे आणि औद्योगिक विकासासाठी पूरक ठरणारे असतील.

ii. एखाद्या योजनेखाली किंवा एखाद्या कार्यान्वयन यंत्रणेद्वारे हाती घेतलेल्या परंतू प्रकल्प किंमतीत वाढ झाल्याने , प्रचलित नियमात बसत नसल्याने निधी उपलब्ध होऊ न शकलेला,

किंवा,

एखादा प्रकल्प केंद्रशासनाच्या किंवा राज्य शासनाच्या निकषामध्ये बसत नाही या कारणास्तव हाती घेता येऊ शकत नाही/पूर्ण होऊ शकले नाही,

किंवा,

**एखाद्या अत्यंत महत्वाच्या पायाभूत सुविधेसाठी नियमित अर्थसंकल्पात पुरेसा निधी उपलब्ध होत नसल्यास पूरक निधी म्हणून या माध्यमातून देता येईल.**

iii. औद्योगिक पायाभूत सुविधांची निर्मिती आणि स्पर्धात्मक औद्योगिक विकासाची सविस्तर माहिती नमूद करण्यात यावी.

iv. प्रकल्प उद्योजक व उत्पादक यांना औद्योगिक विकासाच्या दृष्टीने मदत करणारे व प्रामुख्याने सामायिक सुविधा उपलब्ध करुन देणार असावे.

v. वर नमुद प्रमाणे काही असले तरी सुकाणू समितीला योग्य वाटेल असा औद्योगिक पायाभूत सुविधांशी संबंधित कोणताही प्रस्ताव.

वर नमूद केल्याप्रमाणे फक्त सर्व रितीने परिपूर्ण असलेला प्रस्ताव विचारात घेतला जाईल.

९) **निधी वितरणाची कार्यपध्दती :-**

नियमित अर्थसंकल्पिय कार्यपध्दती वापरून निधी वितरित करण्यात येईल.

१०) **कार्यान्वयन यंत्रणाना निधीचे वाटप :-**

कार्यान्वियन यंत्रणाना निधीचे वाटप आहरण व संवितरण अधिकारी म्हणून विकास आयुक्त, उद्योग यांनी महाराष्ट्र रोखे वितरण प्राधिकरणामार्फत केवळ इलेक्ट्रॉनिक क्लिअरन्स सिस्टिम (ईसीएस) पध्दतीने करण्यात यावे.

४. वरील मार्गदर्शक तत्वे व निकषाप्रमाणे पात्र ठरणारे प्रस्ताव संबंधित कार्यान्वियन यंत्रणांनी व सर्व संबंधितांनी शासनाकडे सादर करावेत.

५. वर नमूद केलेली कार्यपध्दती, अटी व शर्ती तसेच मार्गदर्शक तत्वे जेथपर्यंत शासन निर्णय क्र.आयआयआय-पॉलिसी-२०१० / प्र.क्र.७६८/उद्योग-२, दि.२२ फेब्रुवारी, २०१३ मधील परि.५ मध्ये दर्शविलेल्या तरतुदीशी विसंगत आढळल्यास तेथपर्यंत वरील तरतुदी अधिक्रमित केल्याचे समजण्यात यावे.

६. हा शासन निर्णय नियोजन विभाग व वित्त विभागाशी सल्लामसलत करुन अनुक्रमे त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ३७२/१४६१/निवि, दिनांक ०९/१०/२०१३ आणि ०५/१४/व्यय-१६ दिनांक ०९/०१/२०१४ अन्वये प्राप्त मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१४०२२६१११०४३७५१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Venkatesh Hanamantrao Kulkarni

Digitally signed by Venkatesh Hanamantrao Kulkarni
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Industries Energy & Labour, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Venkatesh Hanamantrao Kulkarni
Date: 2014.02.28 16:59:45 +05'30'

(व्यं.ह.कुलकर्णी)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१) मा.राज्यपालांचे प्रधान सचिव
२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा.मंत्री (उद्योग) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) मा.राज्यमंत्री (उद्योग) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.